CIDCO
WE MAKE CITIES

सकाळ मुंबई, मंगळवार, ३ जून २०२५

### सिडकोकडून भूखंड उपलब्ध; १५ ते २० कोटी खर्च अपेक्षित

# बेलापुरात खंडोबासह तुळजाभवानी मंदिर

तुर्भे, ता. २ (बातमीदार) : बेलापूर विभागातील निसर्गरम्य पारसिक हिलवर खंडोबासह आई एकवीरा देवीच्या भव्य मंदिराच्या बांधकामाला लवकरच सुरुवात होणार आहे. तसेच मंदिर उभारणीसाठी लागणारी बांधकाम परवानगीदेखील महापालिकेकडून मिळाली आहे. तसेच मंदिर उभारणीचा आराखडादेखील तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे पावसाचा जोर कमी होताच मंदिर उभारणीच्या कामाला अखिल आगरी कोळी समाजप्रबोधन ट्रस्टकडून सुरुवात केली जाणार आहे. यासाठी जवळपास १५ ते २० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

नवी मुंबईत राहणाऱ्या बहुतांश नागरिकांचे कुलदैवत व कुलदेवी हे खंडोबा, एकवीरा तसेच तुळजाभवानी आहेत. त्यामुळे नवी मुंबईत वास्तव्याला असणाऱ्या नागरिकांना आपल्या कुलदैवत व कुलदेवीचे दर्शन घेता यावे, यासाठी अखिल आगरी कोळी समाजप्रबोधन ट्रस्टकडून हे मंदिर उभारण्यात येणार आहे. यासाठी सिडकोने दोन हजार चौरस मीटरचा भूखंड उपलब्ध करून दिला आहे. पावसाळ्यानंतर मंदिर उभारण्याचे काम सुरू केले जाणार आहे. खंडोबा हे महाराष्ट्रातील नागरिकांचे आराध्य दैवत मानले जाते. त्यामुळे जेजुरीत खंडेरायाच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात जत्रा भरते, तर कार्ल्याची एकवीरा देवीदेखील आगरी कोळ्यांची कुलदेवी म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. याशिवाय महाराष्ट्राची अराध्य कुलदेवी म्हणून तुळजाभवानी ओळखली जाते. या तिन्ही दैवतांचे दर्शन घेण्यासाठी वर्षभर भक्त गर्दी करत असतात.

नवी मुंबईतूनदेखील या तिन्ही दैवतांचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक जातात. यात आगरी, कोळी समाजातील भाविकांची संख्या लक्षणीय असते, मात्र अनेकांना मनात इच्छा असूनही नियमित या दैवतांचे दर्शन घेता येत नाही, अशा भक्तांना आता नवी मुंबईतच या दैवतांचे दर्शन घेता येणार आहे. सिडकोने नवी मुंबई शहराची उभारणी केली होती. ही उभारणी करताना प्रत्येक विभागात क्रीडांगण, मैदाने, सामाजिक सुविधांबरोबर प्रार्थनास्थळांसाठीही भूखंड आरक्षित ठेवला होता. त्यानुसार हा भूखंड अखिल आगरी कोळी समाजप्रबोधन संस्थेला देण्यात आला आहे. त्यानुसार आता पारसिक हिलचे महत्त्व वाढणार आहे.

### ➔ महापालिकेकडून हिरवा कंदील

खंडेराया व एकवीरा देवीसह तुळजाभवानी मंदिर नवी मुंबईत असावे, यासाठी पाठपुरावा करत होतो, त्यात यश आले आहे. सिडकोने दोन हजार चौ. मी. भूखंड संस्थेला दिला आहे. हे मंदिर सर्व समाजासाठी खुले राहणार आहे. पालिकेकडून बांधकाम परवानगीदेखील मिळाली असल्याची माहिती अखिल आगरी कोळी समाजप्रबोधन ट्रस्टचे संस्थापक नामदेव भगत यांनी दिली.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

पुढारी मुंबई, मंगळवार ३ जून २०२५

# मुंबई ते नवी मुंबई वॉटर टॅक्सी सुरु होणार

## मंत्री नितेश राणेंचे बंदरे विभागाला नियोजनाचे निर्देश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच मुंबई ते नवी मुंबई विमानतळ वॉटर टॅक्सीने जोडण्याचे संकेत दिल्यानंतर सोमवारी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी बैठक घेत यावर शिक्कामोर्तब केले. बंदरे विभागाने या सेवेबाबत नियोजन करावे, असे निर्देश राणे यांनी दिले आहेत. यामुळे मुंबई व नवी मुंबई ही दोन शहरे अवघ्या ४० मिनिटांत जलवाहतुकीद्वारे जोडली जाणार आहेत.

ही वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी त्यांनी वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनलची उभारणी टप्प्या टप्प्याने सुरू करावी. यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. त्याचबरोबर माल वाहतुकीसाठीही जेट्टी उभारण्याची ठिकाणे निश्चित करण्याबरोबरच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचनाही बंदरे विभागाला केल्या आहेत. बैठकीस परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### या सेवेमुळे काय होणार ?



- वॉटर टॅक्सी सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी जोडले जाऊन प्रवासाचाही वेळ वाचणार आहे.
- वॉटर टॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होत पर्यावरणाला फायदा होईल.
- मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल
- अटल सेतूनंतर मुंबई - नवी मुंबई जोडणारी ही महत्त्वाची सेवा ठरणाार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

MUMBAI
TUESDAY
JUNE 03, 2025

Hindustan Times

# Travellers can sail to Navi Mum airport from Radio Club jetty in 40 minutes

Saurabha Kulshreshtha
htmumbai@hindustantimes.com

**MUMBAI:** In a step towards enhancing connectivity to the upcoming Navi Mumbai International Airport, the City and Industrial Development Corporation (CIDCO) and the Maharashtra ports department on Monday discussed plans to launch a water taxi service from South Mumbai.

The service, which will operate from the soon-to-be-developed jetty at Radio Club in Colaba, is expected to ferry passengers to the airport in approximately 40 minutes. Electric water taxis will be used for the route, offering a faster and more sustainable travel option.

Currently, travellers driving from South Mumbai to the airport site via the Mumbai Trans Harbour Link (MTHL) can expect a journey of about 60 to 75 minutes, depending on traffic conditions. The water taxi could therefore save up to 30 plus minutes of travel time, along with reducing road congestion and fuel consumption.

The proposal follows chief minister Devendra Fadnavis's directive during a review meeting on April 24, where he emphasised the need for multi-modal transport connectivity to the Navi Mumbai airport. He directed that the new airport should be linked by road, rail, metro, and water transport to ensure seamless access.

At Monday's meeting, CIDCO's managing director Vijay Singhal presented the proposal to Ports Minister Nitesh Rane. The Maharashtra Maritime Board (MMB), which falls under the ports department, will facilitate the construction of a jetty adjacent to the airport to enable direct water access.

Rane directed officials to prepare a formal proposal for the construction of the jetty and terminal, and to initiate the approval process with the airport authorities.

"The water taxi service will not only enhance connectivity between Mumbai and Navi Mumbai but also save travel time and fuel," Rane said, adding that the service would be integrated with the state's larger plan to promote water transport across the Mumbai Metropolitan Region.

## Fast, green, efficient: Why the water taxi matters

- **QUICK COMMUTE:** 40-minute journey from South Mumbai to Navi Mumbai airport
- **FASTER THAN ROAD:** To save more than 30 minutes compared to travel via MTHL
- **ECO-FRIENDLY TRAVEL:** Electric taxis cut emissions and pollution
- **DECONGESTS ROADS:** Reduces pressure on road and rail infrastructure
- **FUEL SAVER:** Lowers dependency on private vehicles
- **SCENIC ROUTE:** Offers a pleasant, stress-free travel experience via Mumbai's harbour



@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

हमारा महानगर | मंगलवार 3 जून 2025

# गेटवे से नवी मुंबई एयरपोर्ट के बीच चलेगी वॉटर टैक्सी

## बंदरगाह मंत्री का पूरी तैयारी करने का निर्देश



महानगर संवाददाता

मुंबई

गेटवे ऑफ इंडिया के नजदीक रेडियो क्लब जेट्टी से नवी मुंबई के इंटरनेशनल एयरपोर्ट के बीच वॉटर टैक्सी चलाने की योजना है। राज्य के बंदरगाह और मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे ने निर्देश दिया कि इसके लिए विभाग पूरी प्लानिंग बनाए और जरूरत के हिसाब से जेट्टी बनाने के प्रस्ताव पेश जाएं। वे मंत्रालय में वॉटर टैक्सी शुरू करने को लेकर आयोजित बैठक में बोल रहे थे।

उन्होंने कहा कि वॉटर टैक्सी शुरू करने के लिए टर्मिनल बनाने का काम चरणबद्ध ढंग से शुरू किया जाए। इसके लिए एयरपोर्ट अथॉरिटी को आवश्यक परमिट के लिए प्रस्ताव प्रस्तुत करना चाहिए। मंत्री राणे ने सुझाव दिया कि माल परिवहन के लिए जेट्टी बनाने के लिए सभी स्थानों की पहचान की जानी चाहिए। मुंबई में ट्रैफिक की समस्या को कम करने के लिए सरकार वाटर ट्रांसपोर्ट क्षेत्र में महत्वपूर्ण कदम उठा रही है।

मंत्री राणे ने कहा कि एक नई वॉटर टैक्सी सेवा शुरू करने का निर्णय लिया गया है, जिससे मुंबई और नवी मुंबई के बीच यात्रा का समय काफी कम हो जाएगा। इस सेवा से नवी मुंबई के विभिन्न भागों के साथ मुंबई की कनेक्टिविटी बेहतर होगी। यात्रा का समय लगभग 40 मिनट होगा। इन वॉटर टैक्सी सेवाओं में इलेक्ट्रिक नौकाओं के उपयोग से प्रदूषण कम होगा और पर्यावरण को लाभ होगा। इन सेवाओं से मुंबई में यातायात की भीड़ कम होगी और यात्रियों को आरामदायक यात्रा का अनुभव मिलेगा। मुंबई में यह नई जल परिवहन योजना शहर की परिवहन व्यवस्था में सुधार लाएगी तथा नागरिकों को तीव्र, सुरक्षित और पर्यावरण अनुकूल यात्रा का अनुभव प्रदान करेगी।

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

नवभारत
Thane NaviMumbai plus Edition
Jun 03, 2025 Page No. 1

## वाटर टैक्सी शुरू करने का प्रयास हुआ तेज

# 17 मिनट में मुंबई से नवी मुंबई

■ मुंबई (सं). गेटवे ऑफ इंडिया स्थित रेडियो क्लब जेट्टी से नवी मुंबई एयरपोर्ट तक वाटर टैक्सी चलाने के प्रयास तेज हो गए हैं. बंदरगाह मंत्री नितेश राणे ने कोच्चि वाटर मेट्रो की तरह मुंबई में भी उसी प्रकार की सेवा शुरू करने के लिए विस्तृत परियोजना रिपोर्ट (डीपीआर) पेश करने का निर्देश दिया है. वाटर टैक्सी शुरू होने पर मुंबई से नवी मुंबई की दूरी महज 17 मिनट में सिमट कर रह जाएगी. इससे वसई-विरार से कल्याण-डोंबिवली तक के इलाकों से नवी मुंबई एयरपोर्ट तक महज 70 मिनट में पहुंचा जा सकेगा. बैटरी से चलने वाली फेरी मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआर) के विभिन्न हिस्सों को जोड़ेगी. मंत्रालय में सोमवार को वाटर टैक्सी शुरू करने के संबंध में बैठक आयोजित की गई थी. इस बैठक में संबंधित विभागों को वरिष्ठ अधिकारी मौजूद थे. बंदरगाह मंत्री राणे ने कहा कि गेटवे ऑफ इंडिया से नवी मुंबई एयरपोर्ट तक वाटर टैक्सी चलाने का प्रस्ताव दिया गया है. बंदरगाह विभाग को जल्द से जल्द प्रोजेक्ट पूरा करना चाहिए ताकि वाटर टैक्सी शुरू हो सके. साथ ही आवश्यक स्थानों पर जेटी बनाने का प्रस्ताव भी तैयार करना चाहिए. वाटर टैक्सी के लिए टर्मिनल का निर्माण चरणबद्ध तरीके से शुरू किया जाना चाहिए. एयरपोर्ट अथॉरिटी को इसके लिए आवश्यक परमिट के लिए प्रस्ताव प्रस्तुत करना चाहिए. इस प्रोजेक्ट से मुंबई और नवी मुंबई के बीच यात्रा का समय और ट्रैफिक काफी कम हो जाएगा. यह सेवा नवी मुंबई के विभिन्न हिस्सों को मुंबई से जोड़ेगी. वाटर टैक्सी इलेक्ट्रिक होगी.




## 10 हजार वॉटर टैक्सी की होगी जरूरत

मुंबई से नवी मुंबई की दूरी लगभग 34 किलोमीटर है. इस अंतर को पूरा करने में करीब एक घंटे का समय लगता है. ट्रैफिक जाम रहा तो दो से तीन घंटे लग जाते हैं. वाटर टैक्सी से केवल 17 मिनट में यह दूरी तय की जा सकेगी. वॉटर टैक्सी सिर्फ मुंबई को नवी मुंबई से ही नहीं जोड़ेगी, बल्कि समुद्र के रास्ते यह मुंबई के कई अन्य शहरों को भी जोड़ने का काम करेगी. पर्यटन को भी बढ़ावा मिलेगा. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी भी कह चुके हैं कि मुंबई को 10 हजार वॉटर टैक्सी की जरूरत होगी.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd




CIDCO
WE MAKE CITIES

दो बजे दोपहर | मुंबई, मंगलवार, 3 जून 2025

# गेट वे ऑफ इंडिया से नवी मुंबई के हवाई अड्डे तक चलेगी वॉटर टैक्सी

डीबीडी संवाददाता । मुंबई

राज्य के बंदरगाह मंत्री नितेश राणे ने गेट वे ऑफ इंडिया के रेडियो जेट्टी से नवी मुंबई के हवाई अड्डे तक वॉटर टैक्सी सेवा शुरू करने का प्रस्ताव रखा है। उन्होंने बंदरगाह विभाग को इस परियोजना के लिए आवश्यक कार्य योजना तैयार करने और जेट्टी निर्माण के निर्देश दिए हैं।

## मंत्रालय में वॉटर टैक्सी सेवा को लेकर समीक्षा बैठक

सोमवार को मंत्रालय में इस योजना पर समीक्षा बैठक हुई, जिसमें बंदरगाह विभाग के अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई हवाई अड्डा प्राधिकरण के अधिकारी ब्रिजेश सिंघल और महाराष्ट्र मैरीटाइम बोर्ड के अधिकारी उपस्थित थे।

**बंदरगाह मंत्री नितेश राणे ने बंदरगाह विभाग को उचित योजना बनाने के दिए निर्देश**




## चरणबद्ध तरीके से टर्मिनल निर्माण का निर्देश

नितेश राणे ने वॉटर टैक्सी के लिए टर्मिनल निर्माण का काम चरणबद्ध तरीके से शुरू करने और हवाई अड्डा प्राधिकरण को आवश्यक मंजूरी के लिए प्रस्ताव भेजने को कहा। इसके अलावा माल ढुलाई के लिए भी जेट्टी बनाने के लिए स्थान चिन्हित करने का निर्देश दिया। वॉटर टैक्सी सेवा शुरू होने से मुंबई और नवी मुंबई के यात्रियों का समय बचेगा और मुंबई से नवी मुंबई तक का सफर मात्र 40 मिनट में पूरा किया जा सकेगा।

@CIDCO_LTD | @CIDCO_LTD | @cidco_ltd | @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

नवे शहर ▢ मंगळवार, ३ जून २०२५ ▢

# मुंबई ते नवी मुंबई विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सेवा

## बंदर विभागाने नियोजन करण्याची ना. नितेश राणे यांची सूचना

**मुंबई :** मुंबई मधील गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सेवा सुरु करण्याचा प्रस्ताव आहे. याबाबतचे नियोजन बंदरे विभागाने पूर्ण करावे तसेच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशी सूचना राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री ना. नितेश राणे यांनी केली.



वॉटर टॅक्सी सुरु करण्याबाबत मंत्रालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीत ना. नितेश राणे बोलत होते. या बैठकीस परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, 'नवी मुंबई विमानतळ प्राधिकरण'चे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सुरु करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्या टप्प्याने सुरु करावी तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीसाठीही जेटी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत, असे आदेशही ना. नितेश राणे यांनी दिले आहेत.

मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राज्य सरकारने जलवाहतुकीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्य सरकारने रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान नवीन वॉटर टॅक्सी सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

(उर्वरित पान २ वर)

### वॉटर टॅक्सी सेवा...

(पान १ वरून)

या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबई शहराशी चांगल्या प्रकारे जोडला जाणार असून, प्रवासाची वेळ सुमारे ४० मिनिटे असणार आहे. या वॉटर टॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होऊन पर्यावरणाला फायदा होणार आहे. रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सेवा सुरु झाल्यानंतर मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल, असे ना. नितेश राणे यांनी सांगितले.

CIDCO
WE MAKE CITIES

मुंबई तरुण भारत मुंबई, मंगळवार, ३ जून २०२५

# रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई विमानतळ वॉटर टॅक्सीचे नियोजन करा

## मंत्री नितेश राणे यांचे बंदर विभागाला आदेश



**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई विमानतळ येथे 'वॉटर टॅक्सी' सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी बंदरे विभागाने याबाबतचे नियोजन पूर्ण करावे. तसेच, गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचना मत्स्य व्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी दिल्या.

'वॉटर टॅक्सी' सुरू करण्याबाबत मंत्रालयात बैठक संपन्न झाली. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. बैठकीस परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, 'महाराष्ट्र सागरी मंडळा'चे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री राणे म्हणाले, ''वॉटर टॅक्सी' सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्याटप्प्याने सुरू करावी. तसेच, यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीसाठीही जेट्टी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत. मुंबईतील वाहतुककोंडी कमी करण्यासाठी राज्य सरकारने जलवाहतुकीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.''

नवीन 'वॉटर टॅक्सी' सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरित्या कमी होईल. ''या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी चांगल्या प्रकारे जोडला जाईल. प्रवासाची वेळ सुमारे ४० मिनिटे असणार आहे. या 'वॉटर टॅक्सी' सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाला फायदा होईल. तसेच, मुंबईतील वाहतुककोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल,'' असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

CIDCO
WE MAKE CITIES

**नवराष्ट्र** | मुंबई, ३ जून २०२५

## जलप्रवास ● गेट वे ते नवी मुंबई विमानतळ वॉटर टॅक्सी सुरू होणार : मंत्री राणे

# मुंबई-नवी मुंबई प्रवास ४० मिनिटांत

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेटी ते नवी मुंबई विमानतळ येथे वॉटर टॅक्सी सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे मुंबई ते नवी मुंबई ४० मिनिटांत गाठणे शक्य होणार आहे. यासाठी बंदर विभागाने त्यांचे नियोजन पूर्ण करावे, तसेच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात सोमवारी वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत बैठक झाली. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. बैठकीस परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्या टप्प्याने सुरू करावी. तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीसाठीही जेटी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत, अशा सूचना मंत्री राणे यांनी दिल्या.



### मुंबईची कनेक्टिव्हिटी सुधारेल

मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राज्य सरकारने जलवाहतुकीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. नवीन जलटॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरित्या कमी होईल. या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भागांशी मुंबईचे कनेक्टिव्हिटी सुधारेल. प्रवासाची वेळ सुमारे ४० मिनिटे असणार आहे.

### मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल

जलटॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होईल. या सेवांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल. मुंबईतील जलवाहतुकीच्या या नव्या योजनेमुळे शहराच्या वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होईल आणि नागरिकांना जलद, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा अनुभव मिळेल.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

मुंबई, मंगळवार, ३ जून २०२५ नव शक्ति marathi.freepressjournal.in

# मुंबई–नवी मुंबई वॉटर टॅक्सीसाठी नियोजन हवे

## बंदर विभागाला मंत्री नितेश राणे यांचे आदेश



मुंबई : मुंबई व एमएमआर क्षेत्रातील वाहतूककोंडी फोडण्यासाठी वॉटर टॅक्सी उत्तम पर्याय ठरणार आहे. वॉटर टॅक्सीमुळे मुंबई ते नवी मुंबई प्रवास ४० मिनिटांत शक्य होणार आहे. विशेष म्हणजे पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक बोट्सचा वापर करण्यात येणार आहे. वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी नियोजन करा, असे निर्देश मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी बंदर विभागाला दिले.

गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई विमानतळ वॉटर टॅक्सी सुरू करण्याचा प्रस्ताव असून बंदरे विभागाने याबाबतचे नियोजन पूर्ण करावे. तसेच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचना मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.

वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत मंत्रालयात सोमवारी बैठक संपन्न झाली. या बैठकीस परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्याटप्प्याने सुरू करावी. तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीकरिता जेट्टी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत, असे निर्देश मंत्री राणे यांनी दिले.

### आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल

नवीन वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी जोडले जातील. मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल, असे मंत्री राणे यांनी सांगितले.

CIDCO
WE MAKE CITIES

लोकमत मंगळवार, दि. ३ जून २०२५

# 'वॉटर टॅक्सी' जेट्टीसाठी प्रस्ताव तयार करा

## मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांचे निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क



**मुंबई :** गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई विमानतळादरम्यान वॉटर टॅक्सी सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी बंदरे विभागाने याबाबतचे नियोजन पूर्ण करावे. तसेच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत सोमवारी नितेश राणे यांच्याकडे मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीला परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या वॉटर टॅक्सीचा गेट वे ते नवी मुंबई प्रवासाचा वेळ सुमारे ४० मिनिटे असणार आहे. ही वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्यासाठी टप्प्याटप्प्याने टर्मिनल उभारणी सुरू करावी. तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. मालवाहतुकीसाठीही जेट्टी उभारण्याकरिता ठिकाणे निश्चित करावीत, अशा सूचनाही नितेश राणे यांनी बैठकीत दिल्या.

### वाहतूककोंडी कमी होणार, वेळ वाचणार

वॉटर टॅक्सी सेवेमुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल, वाहतूककोंडी कमी होणार आहे. या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी जोडला जाईल. वॉटर टॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाला फायदा होणार आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

पुण्य नगरी www.epunyanagari.com | मुंबई विभाग | मंगळवार, ३ जून २०२५ | मुंबई

संमिश्र

# वॉटर टॅक्सीसाठी नियोजन करा

## नितेश राणेंच्या विभागातील अधिकाऱ्यांना सूचना

मुंबई : गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई विमानतळ येथे वॉटर टॅक्सी सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी बंदरे विभागाने याबाबतचे नियोजन पूर्ण करावे. तसेच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.



वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. बैठकीस विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी राणे म्हणाले की, वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्याटप्प्याने सुरू करावी तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीसाठीही जेट्टी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत. नवीन वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी चांगल्या प्रकारे जोडले जाईल. प्रवासाची वेळ सुमारे ४० मिनिटे असणार आहे. या वॉटर टॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाला फायदा होईल तसेच मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल, असेही राणे यांनी सांगितले.

### नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवा – नितेश राणे



बंदरे विभागाने मुख्यमंत्र्यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पहिल्या तीन विभागांमध्ये क्रमांक मिळवण्याच्या दृष्टीने काम करावे. तसेच अधिक लोकाभिमुख होण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशा सूचना मंत्री नितेश राणे यांनी दिल्या. बोटींना ट्रॅक करण्यासाठी ॲप विकसित करावे. बंदरे विकास आणि बोटींच्या नियंत्रणासाठी विभागाची स्वत:ची अधुनिक व्यवस्था विकसित करावी. या सर्व गोष्टींसाठी अभ्यास दौऱ्यांचे नियोजन करावे. 'आय गॉट' नोंदणी करावी, हरित बंदर उभारणीवर भर द्यावा, असेही निर्देश त्यांनी दिले आहेत.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | मंगळवार, ३ जून २०२५

# नवी मुंबईसाठी वॉटर टॅक्सीचा पर्याय

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

## नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक




लवकरच कार्यान्वित होणाऱ्या नवी मुंबई विमानतळाशी मुंबईला लवकरच जलमार्गाने जोडण्यात येणार आहे. दोन्ही शहरांना जोडण्यासाठी वॉटर टॅक्सी सुरू करण्यात येणार असून त्यासाठी गरजेच्या ठिकाणी जेटी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशी सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी सोमवारी दिली. वॉटर टॅक्सीमुळे मुंबईहून नवी मुंबई विमानतळाला ४० मिनिटांत पोहोचणे शक्य होणार आहे.

वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत मंत्रालयात बैठक घेण्यात आली. परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढिये यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते. वॉटर टॅक्सी वाहतूक सुरू करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या शक्यतांवरही यावेळी विस्तृत माहिती घेण्यात आली.

'वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्याटप्प्याने सुरू करावी, तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत, मालवाहतुकीसाठीही जेटी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत,' अशा सूचना राणे यांनी दिल्या.

सध्या मुंबईहून नवी मुंबईला जाण्यासाठी सायन-पनवेल महामार्ग आणि विलासराव देशमुख पूर्व मुक्त मार्ग असे दोन मार्ग तसेच, हार्बर रेल्वे मार्ग उपलब्ध आहेत.

रेडिओ जेटी ते नवी मुंबई विमानतळ असा वॉटर टॅक्सीचा प्रस्ताव असून त्या मार्गात इतर थांब्यांचीही चाचपणी यावेळी करण्यात आली. या प्रवासासाठी इलेक्ट्रिक बोटींचा वापर करण्यात येणार असल्याने प्रदूषण कमी होण्यास तसेच पर्यावरणाला पूरक असा नवा मार्ग खुला होणार आहे. तसेच, कुठलाही कोंडीशिवाय वेगात नवी मुंबई गाठणे नागरिकांना शक्य होईल.

'मुंबईच्या आसपास जलवाहतुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असून त्याचा वापर होणे गरजेचे आहे. प्रवासी वाहतुकीबरोबरच मालवाहतुकीसाठीही या मार्गाचा वापर होऊ शकतो. नवी मुंबई, ठाणे ही शहरे मुंबईशी जलमार्गाने जोडणे सहज शक्य असून त्यासाठी चोख नियोजन आणि इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे,' असे राणे यांनी सांगितले.

## 'मुंबई-कोकणादरम्यान लवकरच रो रो सेवा'

**चिपळूण :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार जलवाहतुकीलादेखील प्राधान्य देत असून लवकरच मांडवा, माझगाव ते रत्नागिरी, मालवण सागरी रो रो सेवा सुरू करण्यात येणार आहे, असे नितेश राणे यांनी रत्नागिरी येथे सांगितले. रत्नागिरीत सुरू झालेल्या जिजाऊ शैक्षणिक आणि सामाजिक संस्थेच्या श्री भगवान सांबरे मोफत रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी भाजपचे जेष्ठ नेते खासदार नारायण राणे, नितेश राणे हे रत्नागिरी दौऱ्यावर होते. या रो रो सेवेमुळे मांडवा येथून रत्नागिरीपर्यंत तीन तासांत तर मालवण, विजयदुर्गपर्यंत साडेचार ते पावणेपाच तासात पोहोचता येईल, असे राणे म्हणाले.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

लोकसत्ता ★ मुंबई, मंगळवार, ३ जून २०२५

# 'गेटवे' ते नवी मुंबई विमानतळ वॉटर टॅक्सी

## ४० मिनिटांत अंतर पार, वाहतूक कोंडी मुक्त प्रवास

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ क्लब जेट्टी ते नवी मुंबई विमानतळ वॉटर टॅक्सी सुरू करण्यात येणार आहे. याविषयीचा प्रस्ताव मत्स्य विभागाकडे असून यासाठी आवश्यक ठिकाणी जेट्टी उभारण्यात येणार आहे. यामुळे गेट वे ऑफ इंडिया ते नवी मुंबई अंतर ४० मिनिटांत पार करता येणार असून वाहतूक कोंडीमुक्त आणि पर्यावरणपुरक प्रवासाचा लाभ प्रवाशांना घेता येणार आहे.

मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी यासंदर्भात बैठक घेतली होती. या बैठकीत वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्या टप्प्याने सुरू करावी. तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीसाठीही जेट्टी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत, अशा सूचना त्यांनी केल्या. सरकारने नवीन वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी चांगल्या प्रकारे जोडले जातील. या वॉटर टॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोटींचा वापरामुळे प्रदूषण कमी होईल तसेच मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल, असे राणे म्हणाले.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd